Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

Original Article

# भारतातील महिला सबलीकरण कार्यक्रम

**डॉ. सोमनाथ वसंतराव पाटील[1], वर्षा शंकरराव वाळुंज[2]**
[1]संशोधन मार्गदर्शक, साहेबराव शंकरराव ढमढेरे कला आणि वाणिज्य महाविद्यालय, तळेगाव ढमढेरे, तालुका –शिरूर, जिल्हा - पुणे.
[2]संशोधक विद्यार्थिनी, अर्थशास्त्र संशोधन केंद्र, बाबुरावजी घोलप महाविद्यालय सांगवी,पुणे.
**Email:** mutkulenitin156@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-171132
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 11(A)
Pp. 174-177
November. 2025
**Submitted:** 18 Oct. 2025
**Revised:** 28 Oct. 2025
**Accepted:** 11 Nov. 2025
**Published:** 30 Nov. 2025

***गोषवारा***

*महिलांच्या मालमतेवर अधिकार किंवा उत्पादन साधनांवर त्यांचे नियंत्रण अल्प प्रमाणात दिसून येते. अलीकडच्या काळात महिला कुटुंबप्रमुख असणाऱ्या घरांची संख्या वाढत आहे. केवळ राजकीय आरक्षण देऊन उपयोग नाही तर पुरुषांचची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. महिला सक्षमीकरण करण्यासाठी स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करणे आवश्यक आहे. महिला सक्षमीकरण ही निसर्गाच्या सक्षमीकरणापासून स्वातंत्र्य बाब नाही व ती असूही शकत नाही. सर्व दुर्लक्षित लोक आणि देशांच्या सक्षमीकरणापासून ती वेगळी करता येत नाही. महिलांचे लढे आणि चळवळी समाजातील शांतता, पर्यावरण, कामगार, शेतकरी, मानवी अधिकार, लोकशाही विकेंद्रीकरण या विविध घटकांशी जोडणे आवश्यक आहे. तसेच समानता, न्याय, लोकशाही आणि शाश्वतता या तत्वांचे सक्षमीकरण होणे आवश्यक आहे. केवळ महिलांचे नव्हे तर महिलांबाबतच्या दृष्टिकोनाचे सक्षमीकरण होणे आवश्यक आहे. कारण महिला म्हणजे केवळ एक स्वतंत्र विभाग नाही. महिला समाजाचा एक महत्वाचा घटक आहेत. लष्करीकरण, मानवाधिकार, शाश्वत विकास या प्रत्येक समस्येबाबत महिलांचे मते दृष्टिकोन आणि विचार जाणून घेणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक प्रश्न हा तितकाच महत्वाचा आहे.*

***शोधनिबंधातील मूलभूत शब्द** - महिला सबलीकरण, महिला विषयक धोरण.*

## प्रस्तावना

महिला सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासनाने विविध योजना राबविल्या आहेत. उदा. १६ ते ६० वयोगटातील संकटग्रस्त महिलांसाठी, शासकीय महिला वसतिगृहे उभारली आहे. स्वयंसेवी आधारगृहे, संरक्षण समुपदेशन केंद्रे, मनोधैर्य योजना, शुभमंगल सामुदायिक विवाह योजना या महाराष्ट्र शासनातर्फे राबविलेल्या योजना आहेत तर केंद्र सरकारतर्फे नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे, प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रम, स्वाधार, उज्वला या योजना राबविल्या जातात.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे –** संशोधिकेने शोधनिबंधाची पुढील उद्दिष्टे मांडली आहेत.

१. महिला सक्षमीकरण धोरणाची संकल्पना अभ्यासणे.
२. महिला सक्षमीकरण धोरणाची परिणामकारकता पाहणे.
३. महिला सक्षमीकरण विषयक कार्यक्रमांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती –** प्रस्तुत शोधनिबंधाचा प्रकार वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.17935406
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*डॉ. सोमनाथ वसंतराव पाटील, संशोधन मार्गदर्शक, साहेबराव शंकरराव ढमढेरे कला आणि वाणिज्य महाविद्यालय, तळेगाव ढमढेरे, तालुका –शिरूर, जिल्हा – पुणे*

**How to cite this article:**
*पाटील, . सोमनाथ . वसंतराव ., & वाळुंज, . वर्षा . शंकराव . (2025). भारतातील महिला सबलीकरण कार्यक्रम. Journal of Research and Development, 17(11(A)), 174–177. https://doi.org/10.5281/zenodo.17935406*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

**तथ्य संकलन –** प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम माहितीचा वापर केला आहे. शोधनिबंधासाठी आवश्यक असणारी माहिती संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे यातून घेतली आहे.

**सक्षमीकरणाचा अर्थ -** सक्षमीकरण म्हणजे इतरांवर अधिकार सत्ता गाजवणे नाही किंवा आपल्या हिश्यापेक्षा जास्त वाट्यावर आपला हक्क सांगणे नव्हे तर सक्षमीकरण म्हणजे व्यक्तीचे लोभ, हाव, हिंसेची वृत्ती यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार इतरांनाही वाढू देण्याचा त्यांना दिलासा देण्याचा तसेच काळजी घेण्याचा अधिकार होय. न्याय, नितीतत्वे सदाचरण यासाठी लढा देण्याचा अधिकार मनाचा आंतरिक विकास करून स्वतःमध्ये शहाणपण निर्माण करण्याचा अधिकार होय.

**महिला सक्षमीकरणाचा अर्थ -** आज महिला सक्षमीकरणासाठी सर्व स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी मोठ्या प्रमाणात योजना राबवून महिलांना सुविधा उपलब्ध करून दिला जात आहेत. परंतु आजही समाजकारणात 23 of 30 व राजकारणात स्त्रियांचे मोठ्या प्रमाणात मागासलेपण दिसून येत आहे. स्त्रीवादी चळवळीच्या मते, जो पर्यंत स्त्रिया सर्वांगीण सबल होत नाही तोपर्यंत त्यांचे शोषण थांबत नाही. महिला समाजकारण, राजकारण यांमध्ये नेतृत्व करत नाही तोपर्यंत त्या आर्थिकदृष्ट्या समृद्ध होत नाही.

"महिला सबलीकरण म्हणजे महिलांचा सता विभागणीत समान वाटा, निर्णय प्रक्रियेत योग्य स्थान आणि सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक जीवनात त्याबाबतची समानता प्राप्त होणे होय. याचाच अर्थ महिलांचा आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, उद्योग या सर्व क्षेत्रात समान सहभाग अपेक्षित आहे.

**महिला सक्षमीकरणासाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत राबविल्या जाण्याऱ्या उपक्रमांचे अध्ययन -** पुणे जिल्ह्यातील, विशेषत: खेड, शिरूर, भोर आणि बारामती तालुक्यांमध्ये महिला सक्षमीकरणासाठी स्वयंसेवी संस्थांनी राबविलेल्या वसतिगृहे, महिला संस्थांना आर्थिक सहाय्य, व्यावसायिक प्रशिक्षण, शैक्षणिक शिष्यवृत्ती, आर्थिक सहाय्य, अनाथ मुलींचे विवाह आणि महिला बचत गट यासारख्या योजनांसह कार्यक्रमांची माहिती तक्ता क्र.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता क्र.१**
**महिला सक्षमीकरणासाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत राबविल्या जाण्याऱ्या उपक्रमांचे अध्ययन**

| महिला सक्षमीकरणासाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत खालीलपैकी कोणते योजना/उपक्रम राबविले जातात? | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **तालुके** | **आधारगृहे** | **महिला मंडळांना सहाय्यक अनुदान** | **व्यावसायिक प्रशिक्षणासाठी विद्यावेतन** | **अनाथ मुलींच्या विवाहासाठी अर्थसहाय्य** | **महिला बचत गट** | **एकूण** |
| **खेड** | १७ | ३३ | २३ | १० | १७ | १०० |
| **शिरूर** | १५ | ३५ | २६ | १३ | ११ | १०० |
| **भोर** | १६ | ४० | २१ | १२ | ११ | १०० |
| **बारामती** | १६ | ३१ | २९ | ११ | १३ | १०० |
| **एकूण** | ६४ | १३९ | ९९ | ४६ | ५२ | ४०० |
| **टक्केवारी** | १६.० | ३४.८ | १५९.७ | ६७.६ | ७६.५ | **१००** |

**स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे.**

तक्त्याच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की, पुणे जिल्ह्यातील महिला सक्षमीकरणासाठी स्वयंसेवी संस्थांनी राबविलेल्या योजना/कार्यक्रमांची माहिती दिली आहे. खेड तालुक्यात नमुना महिला लाभार्थ्यांपैकी १७ लाभार्थ्यांनी वसतिगृहे, ३३ लाभार्थ्यांनी महिला संस्थांना आर्थिक मदत, २३ लाभार्थ्यांनी व्यावसायिक प्रशिक्षण विद्यावेतन, १० लाभार्थ्यांनी अनाथ मुलींच्या विवाहासाठी आर्थिक सहाय्य, १७ लाभार्थ्यांनी महिला बचत गट राबवले असे मत व्यक्त केले आहे. तसेच शिरूर तालुक्यात नमुना लाभार्थ्यांपैकी १५लाभार्थ्यांनी वसतिगृहे, ३५ लाभार्थ्यांनी महिला संस्थांना आर्थिक सहाय्य, २६ लाभार्थ्यांनी व्यावसायिक प्रशिक्षण स्टायपेंड, १३ लाभार्थ्यांनी अनाथ मुलींच्या विवाहासाठी आर्थिक मदत, ११ लाभार्थ्यांनी महिला बचत गट राबवले असे मत व्यक्त केले आहे. भोर तालुक्यात स्वयंसेवी संस्थांनी १६ लाभार्थ्यांनी वसतिगृहे, ४० लाभार्थ्यांनी महिला संस्थांना आर्थिक मदत, २१ लाभार्थ्यांनी व्यावसायिक प्रशिक्षण विद्यावेतन, १२ लाभार्थ्यांनी अनाथ मुलींच्या विवाहासाठी आर्थिक सहाय्य, ११ लाभार्थ्यांनी महिला बचत गट राबवले असल्याचे मत व्यक्त केले आहे. बारामती तालुक्यात स्वयंसेवी संस्थांनी १६ लाभार्थ्यांनी वसतिगृहे, ३१ लाभार्थ्यांनी महिला संस्थांना आर्थिक मदत, २९ लाभार्थ्यांनी व्यावसायिक प्रशिक्षण विद्यावेतन, ११ लाभार्थ्यांनी अनाथ मुलींच्या विवाहासाठी आर्थिक सहाय्य आणि १३ लाभार्थ्यांनी महिला बचत गट राबवले असे मत व्यक्त केले आहे.

विशेषत: महिलांना आर्थिक स्वातंत्र्य आणि स्वयंपूर्णता प्राप्त करण्यासाठी सक्षम करण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण, मायक्रोफायनान्स आणि शैक्षणिक समर्थन यासारख्या कार्यक्रमांना प्राधान्य दिले पाहिजे. याव्यतिरिक्त, विधवा आणि अनाथ मुलींना आधार देण्यासारख्या महिलांचे आरोग्य, कल्याण आणि सामाजिक संरक्षणास प्रोत्साहन देणारे उपक्रम मजबूत केले पाहिजेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

**शासकीय योजनांमुळे महिला सक्षमीकरणबाबत अध्ययन -** पुणे जिल्ह्यातील खेड, शिरूर, भोर आणि बारामती तालुक्यांमध्ये सरकारी योजनांमुळे महिलांचे सक्षमीकरण झाले आहे का, याची माहिती तक्ता क्र. २ मध्ये दिली आहे.

**तक्ता क्र. २**
**शासकीय योजनांमुळे महिला सक्षमीकरणबाबत अध्ययन**

| शासकीय योजनांमुळे महिला सक्षमीकरण होते असे आपणांस वाटते का? | | | |
|---|---|---|---|
| **तालुके** | **होय** | **नाही** | **एकूण** |
| **खेड** | ६७ | ३३ | १०० |
| **शिरूर** | ७४ | २६ | १०० |
| **भोर** | ७७ | २३ | १०० |
| **बारामती** | ८१ | १९ | १०० |
| **एकूण** | २९९ | १०१ | ४०० |
| **टक्केवारी** | ७४.८ | २५.३ | **१००** |

**स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे.**

तक्त्याच्या विश्लेषणातून असे दिसून येते की, सरकारी योजनांमुळे महिला सक्षमीकरण होते असा विश्वास खेड तालुक्यातील नमुना ६७ प्रतिसादकर्त्यांनी व्यक्त केला आणि नमुना ३३ प्रतिसादकर्त्यांनी सरकारी योजनांमुळे महिला सक्षमीकरण होते असे मानले नाही. त्याचप्रमाणे शिरूर तालुक्यात ७४ प्रतिसादकर्त्यांचा असा विश्वास होता की सरकारी योजनांमुळे महिला सक्षमीकरण होते, तर २६ प्रतिसादकर्त्यांनी सरकारी योजनांमुळे महिला सक्षमीकरण होते असे मानले नाही. भोर तालुक्यात ७७ प्रतिसादकर्त्यांचा असा विश्वास होता की सरकारी योजनांमुळे महिला सक्षमीकरण होते, तर २३ प्रतिसादकर्त्यांनी असे मानले नाही. बारामती तालुक्यात ८१ प्रतिसादकर्त्यांचा असा विश्वास होता की, सरकारी योजनांमुळे महिलांचे सक्षमीकरण होते, तर १९ प्रतिसादकर्त्यांनी सरकारी योजनांमुळे महिला सक्षमीकरण होते याबाबत नकारात्मक भूमिका घेतली.अध्ययनावरून असे दिसून आले आहे की, अनेक महिला शासकीय योजनांमुळे सशक्त झाल्या आहेत. या प्रवृत्तीला चालना देण्यासाठी, शासनाने महिलांच्या शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य आणि सामाजिक सुरक्षिततेसाठी कार्यक्रमांमध्ये गुंतवणूक करणे आणि त्यांना बळकट करणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, अस्तित्वात असलेल्या शासकीय योजना आणि कार्यक्रमांबद्दल जागरूकता वाढविण्याचे आणि त्या सर्व महिलांसाठी, विशेषतः वंचित समुदायातील महिलांसाठी प्रवेशयोग्य आणि समावेशी आहेत याची खात्री करण्याचे प्रयत् करावेत.

**महिला सक्षमीकरणातून सामाजिक विकास आणि सामाजिक विकासाला मदत करणारे घटक -** पुणे जिल्ह्यातील विशेषतः खेड, शिरूर, भोर आणि बारामती तालुक्यांमध्ये महिला सक्षमीकरणामुळे सामाजिक विकासात हातभार लागतो की नाही आणि सामाजिक विकासाला हातभार लावणारे घटक याविषयी माहिती तक्ता क्र.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता क्र. ३**
**महिला सक्षमीकरणातून सामाजिक विकास आणि सामाजिक विकासाला मदत करणारे घटक**

| महिला सबलीकरणामुळे सामाजिक विकासाला मदत होते काय? | | | | सामाजिक विकासाला खालीलपैकी कोणते घटक मदत करतात? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **तालुके** | **होय** | **नाही** | **एकूण** | **सामाजिक नीतिमूल्य** | **समानतेची जाणीव** | **हक्क कर्तव्य अधिकारांची जाणीव** | **निर्णय क्षमता वृद्धीगत होते** | **कौशल्य व क्षमतांचा विकास** | **एकूण** |
| **खेड** | ८९ | ११ | १०० | २१ | १५ | २० | १६ | १७ | १०० |
| **शिरूर** | ८२ | १८ | १०० | २२ | १३ | १५ | ११ | २१ | १०० |
| **भोर** | ८६ | १४ | १०० | १५ | २० | २४ | १० | १७ | १०० |
| **बारामती** | ८० | २० | १०० | २० | १८ | १९ | १३ | १० | १०० |
| **एकूण** | ३३७ | ६३ | ४०० | ७८ | ६६ | ७८ | ५० | ६५ | ४०० |
| **टक्केवारी** | ८४.३ | १५.८ | **१००** | १९.४ | १६.५ | १९.४ | १२.५ | १६.२ | **१००** |

**स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे.**

महिला सक्षमीकरण सामाजिक विकासात योगदान देते की नाही आणि सामाजिक विकासात योगदान देणारे घटक याबद्दल तक्त्याच्या विश्लेषणातून असे दिसून येते की, खेड तालुक्यात, ८९ प्रतिसादकर्त्यांनी महिला सक्षमीकरणामुळे सामाजिक विकासाला हातभार लागतो असे मत व्यक्त केले, तर ११ प्रतिसादकर्ते महिला सक्षमीकरणामुळे सामाजिक विकासाला हातभार लागतो या विधानाशी असहमत असल्याचे दिसून येते. खेड तालुक्यातील सामाजिक विकासाला हातभार लावणारे घटक पुढीलप्रमाणे आहेत: २१ सामाजिक मूल्ये आणि

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

नियम, १५ समानतेची जाणीव, २० अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव, १६ निर्णय क्षमता, आणि १७ कौशल्ये आणि क्षमतांचा विकास अशा एकूण १०० प्रतिसादकर्त्यांचा समावेश आहे. शिरूर तालुक्यात ८२ प्रतिसादकर्त्यांचा असा विश्वास होता की, महिला सक्षमीकरणामुळे सामाजिक विकासात हातभार लागतो, तर १८ प्रतिसादकर्ते महिला सक्षमीकरणामुळे सामाजिक विकासाला हातभार लागतो या विधानाशी असहमत असल्याचे दिसून येते. शिरूर तालुक्यात २२ सामाजिक मूल्ये आणि निकष, १३ समानतेची जाणीव, १५ अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव, ११ निर्णय क्षमता, आणि २१ कौशल्ये आणि क्षमतांचा विकास अशा एकूण १०० प्रतिसादकर्त्यांचा समावेश आहे. भोर तालुक्यात, ८६ उत्तरदात्यांचा असा विश्वास होता की महिला सक्षमीकरण सामाजिक विकासात योगदान देते, तर १४ प्रतिसादकर्ते महिला सक्षमीकरणामुळे सामाजिक विकासाला हातभार लागतो या विधानाशी असहमत असल्याचे दिसून येते. भोर तालुक्यात १५ सामाजिक मूल्ये आणि निकष, २० समानतेची जाणीव, २४ अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव, १० निर्णय क्षमता, आणि १७ कौशल्ये आणि क्षमतांचा विकास अशा एकूण १०० प्रतिसादकर्त्यांचा समावेश आहे. बारामती तालुक्यात ८० प्रतिसादकर्त्यांनी महिला सक्षमीकरणामुळे सामाजिक विकासात हातभार लागतो असे मत व्यक्त केले, तर २० प्रतिसादकर्ते महिला सक्षमीकरणामुळे सामाजिक विकासाला हातभार लागतो या विधानाशी असहमत असल्याचे दिसून येते. भोर तालुक्यात १५ सामाजिक मूल्ये आणि निकष, २० समानतेची जाणीव, २४ अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव, १० निर्णय क्षमता, आणि १७ कौशल्ये आणि क्षमतांचा विकास अशा एकूण १०० प्रतिसादकर्त्यांचा समावेश आहे.विश्लेषणाच्या आधारे हे स्पष्ट होते की, महिला सक्षमीकरणाचा सामाजिक विकासावर महत्त्वपूर्ण प्रभाव पडतो. हा प्रभाव आणखी वाढवण्यासाठी, सामाजिक मूल्ये, समानता आणि हक्क आणि कर्तव्यांची जाणीव वाढवण्यावर पुढाकार घेण्याची शिफारस केली आहे. याव्यतिरिक्त, निर्णय घेण्याची क्षमता, कौशल्ये आणि क्षमता वाढवणाऱ्या कार्यक्रमांना प्राधान्य दिले पाहिजे.

**सारांश**

कुटुंबाच्या समुदायाच्या व देशाच्या विकासासाठी आणि कल्याणासाठी स्त्री पुरुष समानता आणि महिलांचे सक्षमीकरण आवश्यक आहे. ज्या कुटुंबात समाजात देशात निम्मी लोकसंख्या स्त्रियांची आहे त्या कुटुंबात समाजात देशात स्त्रियांना सन्मानाने वागवले पाहिजे. भारतासह जगातल्या बहुतेक देशात स्त्री पुरुष असा भेदभाव केला जातो. निर्णय प्रक्रियेत महिलांना दूर ठेवले जाते. अधिकारांपासून वंचित ठेवले जाते या प्रमुख कारण पितृसत्ताक व पुरुषप्रधान संस्कृती होय. समाजात महिलांपेक्षा पुरुषांना श्रेष्ठ मानले जाते. साधनसंपत्ती, निर्णयप्रक्रिया आणि विचारसरणी यावर पुरुषांचे जास्त नियंत्रण असते. भारतात मानवी विकासाच्या सर्व निर्देशकांमध्ये महिलांना पुरुषांच्या तुलनेत मागील स्थानावर आहेत. भारतातील स्त्री पुरुष प्रमाण आर्यूमर्यादा पुरुषांपेक्षा कमी आहे. आरोग्य, पोषण, शिक्षण अल्प प्रमाणात दिसून येते बहुतेक महिला कमी कौशल्याच्या आणि कमी पैसे देण्याऱ्या कामावर राबत असतात. पुरुषांच्या तुलनेत त्यांचे उत्पन्न कमी दिसते.

**संदर्भसूची**


1. मुलानी एम. यु. (नोव्हेंबर २००८), अल्प बचत नियोजन (बचत गट) डायमंड पब्लिकेशन, पुणे. पान. नं. १ ते ३.
2. साधन (२००५) स्वयंसहाय्य गट कामगिरी मोजमाप भारतीय लघुउद्योग विकास बँक पुरस्कृत चैतन्य उपक्रम.पान नं. ३ ते ५
3. मुलानी. एम. यु. (डिसेंबर २००६), 'महिला स्वयं साहाय्यता बचतगट' डायमंड पब्लिकेशन, पुणे. पान. नं. १ ते २६ .
4. युनुस महंमद (३१ ऑक्टोबर २००७), 'बँकर टू द पुअर-अनुवाद' शरद पाटील, सुविधा प्रकाशन, सोलापूर. पान नं. १ ते ३७०.
5. कुमार प्रिया (२०१७), "ग्रामीण महिला सक्षमीकरणासाठी सरकारी योजनांच्या परिणामकारकतेचे मूल्यांकन" पीएचडी शोधप्रबंध, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, दिल्ली. पृष्ठ क्र. १२ ते ४३.
6. शर्मा कामिनी (२०१६), "शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण महिला सक्षमीकरण: बेटी बचाओ बेटी पढाओ योजनेचा अभ्यास" पीएचडी शोधप्रबंध, हैदराबाद विद्यापीठ, हैदराबाद.
7. कमलकन्नन एस. (२०१७), "शिक्षणाद्वारे ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण: कर्नाटकचा सूक्ष्म अभ्यास" पीएचडी शोधप्रबंध, बंगलोर विद्यापीठ, बेंगळुरू.
8. रामचंद्रन श्रीदेवी (२०१६), "केरळमधील ग्रामीण महिला सक्षमीकरणासाठी सरकारी योजनांच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन", पीएचडी थीसिस, केरळ विद्यापीठ. केरळ.
9. पांग सिला (२०१५), "लिंग समानता: दक्षिण कोरियामध्ये महिलांचे राजकीय सक्षमीकरण" पीएचडी शोधप्रबंध, मॉन्टेरी, कॅलिफोर्निया: नेव्हल पोस्ट ग्रॅज्युएट स्कूल.
10. कुमारी के. (२०२०), "स्वयं-सहायता गटांद्वारे ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण: आंध्र प्रदेशचा अभ्यास" पीएचडी शोधप्रबंध, आंध्र विद्यापीठ, विशाखापट्टणम.
11. कुलकर्णी एस. एस. (२०१७), "ग्रामीण महिला सक्षमीकरणावर सरकारी योजनांचा प्रभाव" पीएचडी शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.